Kind attn:- Dr. Venugopal
Director (STPI).

55

खाजगी माहिती तंत्रज्ञानांच्या पार्कचे
निकष आणि अटी व शर्तीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र. आयटीपी-२००७/प्र.क्र.१६६४/उद्योग-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २ फेब्रुवारी, २००७

वाचावे :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक - २०००/४२२९/सीआर-१०६४/म.१, दिनांक ०५/०५/२००१.

२) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे आदेश क्र. मातं/खाजगी/मातं-उद्यान/मुद्रांक शुल्क (१९)/२००१/टी-२९८९५ दिनांक [illegible]/२००१

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,क्र.आयटीपी-२००३/सीआर-३३११/उद्योग-७,दिनांक १२/०७/२००३.

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक -२००३/२०९३/प्र.क्र.४६२/म-१, दिनांक २९/१२/२००३.

५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.आयटीपी- २००५/प्र.क्र.३९२३/उद्योग-७ दिनांक १०/०६/२००५.

६) शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. आयटीपी-२००५/प्र.क्र.१०९७/उद्योग-२ दिनांक २४/११/२००५.

७) शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. आयटीपी-२००५/प्र.क्र.१३२७/उद्योग-२ दिनांक २६/०५/२००६.

**-: शुध्दीपत्रक :-**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण, २००३ अंतर्गत गठित करण्यात आलेल्या शक्तिप्रदान समितीच्या दिनांक १७/१०/२००६ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार उपरोक्त संदर्भ क्र. ५,६ व ७ येथील उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.आयटीपी-२००५/प्र.क्र.३९२३/उद्योग-७, दिनांक १०/०६/२००५., शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. आयटीपी-२००५/प्र.क्र.१०९७/उद्योग-२ दिनांक २४/११/२००५.व शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. आयटीपी-२००५/प्र.क्र.१३२७/उद्योग-२ दिनांक

२६/०५/२००५. रोजी आली नमुद केल्यानुसार दुरुस्ती तसेच जादा बाबी समाविष्ट करण्यात येत आहेत.

१) <u>शासन निर्णय दिनांक १०/०६/२००५ मधील परिशिष्ट-१, मुद्दा क्र.२ अनुक्रमांक १:-</u>

अ) माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी आवश्यक किमान बांधकाम क्षेत्रफळ (२०,००० चौ.फूट) किंवा किमान जमिन (दोन एकर) या निकषाच्या पूर्ततेसाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक / टीडीआर विचारात न घेता फक्त मुळ चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठीचे सदरचे निकष पूर्ण करणे आवश्यक राहील.

ब) माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या प्रस्तावित बांधकामाचे विविध टप्पे किंवा पूर्ण बांधकाम झालेल्या इमारती खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान उभारणीसाठी आवश्यक मुलभूत [illegible] / नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल. बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीचे बाबतीत प्रचलित विकास नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मुळ चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन (टीडीआर चा वापर करुन) जादा बांधकाम (बीयुए) केलेल्या इमारतीबाबत जर ते खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या उभारणीचे मुळ निकष पूर्ण करित असतील तर अशा प्रस्तावांतील इमारतीना पूर्ण क्षेत्रफळासाठी (बीयुए) इरादापत्र / नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल, परंतू त्यांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत देण्यात येणार नाही.

२) <u>शासन निर्णय दिनांक १०/०६/२००५ मधील परिशिष्ट-१, मुद्दा क्र.२ अनुक्रमांक ३:-</u>
एखाद्या विकासकाने त्यांच्या बहुउद्देशीय प्रकल्पात खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानासोबतचे इतर प्रकल्प (उदा.निवासी किंवा व्यापारी संकुल) उभारण्याचे ठरविल्यास त्यातील खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाकरिता एक समर्पित सबस्टेशनची अट शिथिल करुन त्याऐवजी पूर्ण प्रकल्पास एक समर्पित सबस्टेशन असणे मान्य करण्यांत येईल मात्र अशा एकत्रित प्रकल्पाकरिता खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या धोरणानुसार, म्हणजेच २० वॅट प्रती चौ.फूट या दराने अखंडीत वीज पुरवठा करावा लागेल व त्यासंदर्भात आवश्यक ते हमीपत्र विकासकाकडून घेणे बंधनकारक राहील.

३) **शासन निर्णय दिनांक १०/०६/२००५ मधील परिशिष्ट-१, मुद्दा क्र.२ अनुक्रमांक ६ :-**
खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानात मल्टीलेवल पार्किंगची सोय (फ्री ऑफ एफ.एस.आय.) करण्याची मुभा देण्यात येईल.

४) **शासन शुध्दीपत्रक दिनांक २६ मे, २००६ मधील मुद्दा क्रमांक अ (१) :-**
विकासकाने माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या निकषानुसार विविध बाबींची पूर्तता केली आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी सहमाही प्रगती अहवाल दाखल करणे आवश्यक राहील. यासाठी आवश्यक असल्यास सक्षम अधिकाऱ्यांनी भेटीअंती अहवाल प्राप्त करावा. तसेच निकषांची पूर्तता न केल्याचे आढळल्यास विकासकावर दंडनीय कार्यवाही करावी.

५) **शासन शुध्दीपत्रक दिनांक २६ मे, २००६ मधील मुद्दा क्रमांक अ (२) :-**
सध्याच्या प्रचलित धोरणानुसार विहित कालावधीत (तीन वर्ष अधिक एक वर्ष) विकासकाने प्रकल्प पूर्ण न केल्यास किंवा पुढील मुदतवाढीसाठी विनंती केल्यास अजून १ वर्षासाठी विधीग्राहयता वाढवून देण्याचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग) यांना देण्यात येत आहेत.

६) **कच्च्या व भांडवली मालावर जकात कर माफी :-**

अ) शासनाच्या धोरणानुसार माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा उद्योगांना जकात कर माफी अनुज्ञेय करताना सध्या स्थानिक संस्था फक्त माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत परिशिष्ट "I" आणि "IA" व उद्योग संचालनालयाची शुध्दीपत्रके दिनांक ०८/०४/२००५ व २६/१०/२००५ यामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तूंचाच विचार करतात.

यातील समाविष्ट वस्तूंव्यतिरिक्तही वस्तू या व्यवसायाला आवश्यक आहेत हे लक्षात घेऊन खालील निर्णय घेण्यात आला आहे:-

वरील उल्लेखलेल्या शासन निर्णयात समाविष्ट नसलेल्या परंतु त्याच्या आवश्यकतेबाबत व परिमाणाबाबत (quantity) एस.टो.पी.आय. संस्थेने प्रमाणित केलेल्या सर्व वस्तूंवर जकात कर माफी अनुज्ञेय होईल.

वरीलप्रमाणे जकातकर माफीची सवलत नवीन किंवा अस्तित्वात असलेल्या माहिती तंत्रज्ञान घटकास दिनांक १७/१०/२००६ पासून लागू करण्यात येत आहे.

ब) खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान उभारणीस विहीत करण्यात आलेल्या निकष, अटी व शर्तींनुसार उद्यानास लागणाऱ्या एकूण वीजेच्या ३० टक्के इतक्या राखीव वीज

निर्मितीची डी.जी.सेटच्या माध्यमातून व्यवस्था करण्याची अट लक्षात घेता डी.जी. सेट वर जकात कर माफी अनुज्ञेय राहील.

७) **कम्युनिकेशन टॉवर :-**

माहिती तंत्रज्ञान घटकांना चांगल्या प्रतीची कनेक्टीव्हीटी व इतर सेवा सुविधा पुरविण्यासाठी कम्युनिकेशन टॉवरचे जाळे उभारणे आवश्यक असल्यामुळे कम्युनिकेशन टॉवर उभारणे ही सेवा औद्योगिक स्वरूपाची बाब समजण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सही)
( छाया अग्निहोत्री )

प्रत,

१) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, महसूल पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
५) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई.
६) मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
८) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
११) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
१२) विभागीय आयुक्त, मुंबई/.पुणे/ नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती
१३) महानिरीक्षक, नोंदणी व नियंत्रक, मुद्रांक शुल्क, पुणे.
१४) निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई.
१५) उद्योग सह संचालक (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय, मुंबई.
१६) संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, पुणे.
१७) उप महानिरीक्षक, मुद्रांक शुल्क, मुंबई.
१८) उद्योग विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/कक्ष अधिकारी.
१९) कक्ष अधिकारी (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवड नस्ती (उद्योग-२)

022-27812034